ग्रं. सं. ठाणे
विषय — चरित्र
वा. नं. १८५

१८५

चरि.

म. ग्रं. सं. ठाणं

विषय
चरित्र

संग्रहालय क्रमांक
१८५
८२३

लेखक

सन
१


पुस्तकाचें नांव दादाभाई नवरोजी चरित्र

सन १८९४

8/6 - १७५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल



आपल्या

हतभाग्य देशाचे

खरे कैवारी

व

निःसीम हितचिंतक



हिरवान ए. ओ. ह्यूम——आणि——नामदार दादाभाई नौरोजी.

# आन॰ दादाभाई नौरोजी, एम्. पी.



" To see him is to see Carlyle's picture of 'the holiness and sanctity of work' personified."

# नामदार दादाभाई नौरोजी एम. पी.

मुंबई येथील एका साधारण स्थितींतल्या पण कुलीन पार्शी घराण्यांत इ. स. १८२५ त दादाभाई यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच यांच्या अंगीं विलक्षण बुद्धिचापल्य व तेजस्वीपणा दृष्टीस पडूं लागला होता, त्यामुळें मिसेस पोस्टन नामक एका पाश्चात्य ग्रंथकर्त्रीकडून या पुरुषाचे गुणानुवादास याच्या विद्यार्थिदशेंतच आरंभ झाला. तिनें आपल्या 'वेस्टर्न इंडिया' नामक पुस्तकांत या छोट्या 'दादी'ची वर्गांत प्रश्न सांगतांना जी तर्तरी व गडबड असे तिचें मोठें मनोहर वर्णन केलें आहे. दादाभाईंची विद्यार्थी दशा संपल्यावर प्रथमतः त्यांना अनुक्रमें शिक्षक, मग एल्फिन्स्टन पाठशाळेंत उपगुरु व मागून मुख्य गुरु याप्रमाणें जागा मिळाल्या. पाठशाळेंत एतद्देशियास मुख्य गुरुत्वाचा सन्मान नुसत्या मुंबईतच नव्हे तर अवघ्या हिंदुस्थानांत प्रथम याच गृहस्थास मिळाला. गणितशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र या दोन विषयांचे हे अध्यापक होते. यांच्या या नेमणुकीचें त्यावेळच्या शिक्षणसंस्थेनें फार अभिनंदन केलें. आणि त्या संस्थेचे सेक्रेटरी मि. स्टोवेल यांनीं तर आपल्या आनंदप्रदर्शक पत्रांत यांच्या सरळ व एकनिष्ठ वृत्तीची प्रशंसा करून, याच गुणांनीं आपण कालांतरानें आपल्या देशास भूषणास्पद व्हाल

मराठी ग्रंथ संग्रहालय

असा आपला आशिर्वादात्मक मनोभावही प्रगट केला आहे. हल्लीं त्यावेळच्या या आंग्ल गृहस्थाचा हा सरळ मनोभाव पूर्णपणें सत्य झाला आहे हें सांगावयाला नकोच.

विद्यार्थी दशेंतून निवून विद्याध्यापकाच्या धंद्यास लाग-ल्यावर दादभाईनीं आपला खाजगी वेळ सार्वजनिक गोष्टींकडे लावण्यास आरंभ केला. स्वज्ञातिसुधारणेच्या व सार्वजनिक उपयोगाच्या अशा अनेक संस्थांचे ते उत्पादक झाले. व कांहींचें पुरस्कर्तृत्व आंगावर घेऊन त्यांचे ते एकनिष्ठ चालक ही बनले. आमच्या 'राष्ट्रीय सभेचें जनक' त्व जसें मे० ह्यूमसाहेबांकडे आहे त्याप्रमाणें दादाभाईस मुंबईतील 'कन्या शालांचे जनक' ह्मणून लोक सन्मान देतात. त्या कन्या शाला त्यावेळीं स्वसंतोषानें विनवेतनी शिक्षक बनलेल्या कित्येक सद्गृहस्थांनीं आपापल्या घरीं सकाळीं फुरसुतीच्या वेळीं चालविल्या होत्या. सार्वजनिक संस्थांचें पुरस्कर्तृत्व आणि चालकत्व हें कसें असावें हें दादाभाईना *उत्तम प्रकारें साधलें

---

* रा. चंदावरकर यांणीं एकेवेळीं या पुरुषासंबंधानें लि-हीत असतां यांच्या या गुणाविषयीं असाच उल्लेख केला आहे. ते लिहितात-

"—This venerable gentleman, who can work under any disadvantages and has the wonderful knack of bringing together con-flicting forces so as to make them operate

होतें. मुंबईस ' रास्तगुफ्तार ' नांवाचें जें गुजराथी वर्तमानपत्र आहे तें इ. स. १८५१ त प्रथमतः दादाभाईंनींच सुरू केलें. दोन वर्षेंपर्यंत त्या पत्राचे ते संपादक होते. त्या वेळीं आपल्या लेखनश्रमाबद्दल त्यांनीं कांहीं एक घेतलें नाहीं इतकेंच नव्हे तर कांहीं कारणामुळें ज्या वेळीं इतर कोणाकडून तें लिहवून घेण्यांत येई त्या वेळीं ते स्वतः त्या लिहिण्याचें वेतन लिहिणारास देत असत. दादाभाईंच्या अशा स्वहितनिरपेक्ष बुद्धीनें चालविलेल्या श्रमामुळें आज गुजराथी वर्तमानपत्रांची स्थिति चांगली असून, या पत्राची गणना तर प्रमुख वर्तमानपत्रांत आहे. याप्रमाणें दादाभाई अनेक संस्था आंगमेहनतीनें चालवीत होते व लेखनव्याख्यानद्वारां सार्वजनिक चळवळीस मदत करीत होते. तरी उद्योगीपणाविषयीं त्यांची इतकी कमाल असे कीं, अशाही वेळांत त्यांनीं कित्येक भाषांचा अभ्यास चालू ठेवला होता; व त्यामुळें दादाभाईस इंग्रजी, पारशी, गुजराथी, मराठी, हिंदुस्थानी व फ्रेंच अशा सहा भाषा उत्कृष्ट अवगत आहेत असें कळतें.

---

towards one end and, that is, the public good. No one can come across him without feeling the charm of his presence, and drawing some inspiration from his example...... ..He labours and others feel ashamed not to go and do the same."

आपल्या देशाच्या उन्नतीकरितां आपण येथें कितीही श्रम केले तरी तेवढ्यानेंच कांहीं पुरें नाहीं. [illegible] या देशाचीं मुख्य सूत्रें जेथून हालतात, निदान जेथल्या लो[illegible]रास अनुसरूनच या सूत्रचालनास गति मिळत असते, त्या आंग्लभूमींत आपल्या चळवळीचें बीजारोपण झालें पाहिजे, ही कल्पना दादाभाईंच्या मनांत ह्या सुमारास सहजच आली. इंग्लंड आणि हिंदुस्थान या दोन देशांचा संबंध विशेष वाढून दोघांची एकमेकांस खरी ओळख झाली पाहिजे आणि ह्या कामाकरितां इंग्लंदास जातां येईल तर बरें असें दादाभाईंच्या मनांत आलें. इतक्यांत एका पार्शी कंपनीच्या मनांत इंग्लंडमध्यें आपली एक शाखा स्थापन करण्याचा विचार आला आहे हें दादाभाईंस कळलें. इकडील मंडळीनें विलायतेसारख्या वाणिज्यकर्मकुशल देशांत जाऊन व्यापार चालवावयाचा हें कर्म विशेष धाडसाचें खरें; पण 'कामा कंपनी' नें तें अंगावर घेतलें आणि दादाभाईंनींही पूर्वोक्त उद्देशाचे सिद्ध्यर्थ तें पसंत करून आपण त्या कंपनींत भागीदार होऊन तिच्या वतीनें ते विलायतेस जाण्यास निघाले. आजपर्यंतचा व्यवसाय अध्ययनाध्यापनाचा; व्यापारकर्माविषयीं पूर्ण अनभ्यास; परंतु दादाभाईंनीं तें कांहीं मनांत न आणतां विलायत गांठली आणि तेथें आपल्या उद्योगाचा झेंडा रोंवला. हिंदुस्थानांतील मुलकी आणि वैद्य खात्यांतल्या मोठमोठ्या हुद्याच्या जागा

मिळण्यासाठीं विलायतेस होत असलेल्या परीक्षांत एतद्देशी-यांना बसण्याची नुकतीच परवानगी झाली होती. तेव्हां ह्या परीक्षा देण्याकरितां इकडून पुष्कळ एतद्देशीय उमेदवारांनीं जावें ही दादाभाईची उत्कट इच्छा असे. ते त्याबद्दल इकडील लोकांना वारंवार उत्तेजन देत असत.व अशा उमेदवारांची विलायतेस गेल्यावर राहण्याची वगैरे सुव्यवस्था असावी ह्मणून ते स्वतः तेथें उत्तम प्रकारें काळजी ठेवीत. जो व्यापार उद्योग त्यांनीं तेथें आरंभला होता तो यथासंभव साधून त्यांनीं तेथेंही हिंदुस्थानसंबंधीं कित्येक सार्वजनिक संस्था उभ्या केल्या. व तेथल्या कित्येक संस्थांचे ते सभासद होऊन त्यांना हिंदुस्थानाविषयीं अनेक गोष्टींची चर्चा करावयास भाग पाडलें. विद्वत्ता, हुषारी, सरळपणा, परार्थपरता इत्यादि गुणांनीं दादाभाई विलायतेंतील अनेक उदारधींच्या आदरास प्राप्त होऊन त्यांचा तिकडे पुष्कळ गौरव होत गेला. अनेक विद्वत्सभांनीं त्यांचा सन्मान केला व त्यांच्या हिंदुस्थानसंबंधीं विचारांकडे सर्वांचें लक्ष वेधत चाललें. हिंदुस्थानवासी जनांच्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक व शिक्षणसंबंधीं स्थिति विशेषावर त्यांनीं अनेक सभांत निबंध वाचले व चर्चा केली आणि पत्रें व पुस्तकें यांतून लेख प्रसिद्ध केले.

याप्रमाणें सुमारें वीस वर्षें इंग्लंदांत स्वदेशोद्धारणार्थ परिश्रम करून सन १८६९ मध्यें ज्या वेळीं दादाभाई हिंदु-

स्थानांत परत आले त्या वेळीं मुंबईंत त्यांचा फारच मोठा सत्कार लोकांनीं केला. ज्यांत त्यांच्या आजपर्यंतच्या देशहितसंवर्धक परिश्रमांचें योग्य वर्णन केलें आहे असें एक मानपत्र, व त्यांच्या स्वहितनिरपेक्ष मेहनतीचें अल्पसें अंशानें पारितोषिक ह्मणून कांहीं द्रव्य असें त्यांस त्या वेळीं अर्पण करण्यांत आलें, व त्यांचा एक पूर्ण आकाराची तसबीर तयार करवून ती फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूटमध्यें त्यांच्या स्मरणार्थ ठेवण्यांत आली. मुंबापुरस्थ जनांकडून ह्या प्रसंगीं दादाभाईस जें पारितोषिक मिळालें त्याचा बराच भाग त्यांनीं सार्वजनिक कामांतच खर्चला असें ह्मणतात. मुंबईस आल्यावर तेथें दादाभाईंनीं विलायेंतल्या ' ईस्टइंडिया असोसिएशन ' ची शाखा स्थापन केली. अनेक प्रकारच्या महत्वाचे विषयांवर त्यांचीं व्याख्यानें व लेखनक्रिया चालू होतीच. या त्यांच्या अव्याहत लेखनव्याख्यानक्रमानें हिंदुस्थानच्या वास्तविक स्थितीचें आंग्लजनांस बरेंच ज्ञान होऊन उत्तरोत्तर त्यांचें लक्ष इकडल्या विषयांकडे विशेष काळजीनें जाऊं लागलें इ. स. १८७३ सालीं ब्रिटिश पार्लमेंटच्या सिलेक्ट कमेटीपुढें हिंदुस्थानसंबंधीं कांहीं विषयाची माहिती सांगून ७४ सालीं ते परत हिंदुस्थानांत आल्यावर बडोदा संस्थानचे त्या वेळचे अधिपति श्री० मल्हारराव गाईकवाड यांच्या आग्रहावरून दादाभाई हे त्या संस्थानचे दिवाण झाले.

पार्शी जातींत अशा दिवाणगिरीचा सन्मान आजपर्यंत कोणालाच मिळालेला नव्हता; परंतु दादाभाईंच्या अलौकिक गुणांवरून त्यांस तो मिळाला व संस्थानांच्या उन्नत स्थितीबद्दल त्यांचे जे विचार होते त्या विचारांचा प्रत्यक्ष उपयोग करून पाहण्याची ही संधी जाणून त्यांनींहि हा सन्मान मोठ्या उत्सुकतेनें पत्करला.

सरकार व राजे लोक हे केवळ लोकांच्या सोईसाठीं आहेत, त्यांच्या सोईसाठीं कांहीं लोक नाहींत, आणि कोणत्याही संस्थानचें खरें सुख किंवा कल्याण तेथील लोक जसे सुखी आणि सुस्थित असतील त्यावर अवलंबून असतें, अशा प्रकारचे दादाभाईंचे विचार असून, हे विचार ते आपल्या स्वाभाविक सरळ आणि प्रामाणिक आचरणानें त्या संस्थानच्या ऊर्जित दशेच्या उपयोगी पडतील असें समजून होते. परंतु त्या वेळची बडोदा संस्थानची स्थिति फारच विलक्षण झाली होती. अशा स्थितींत आपल्या सरळपणाची बूज राहणें अशक्य वाटून सात आठ महिन्यांचे अवकाशांतच दादाभाईंनीं त्या दिवाणगिरीचा राजीनामा दिला. बडोदें प्रकारणांतलें प्रसिद्ध कर्नल फेअरसाहेब हे त्या वेळीं तेथचे रेसिडेंत होते. त्यांनीं पुढें पार्लमेंटच्या ' ब्ल्यूबुकांत ' दादाभाईंच्या अल्पकालीन दिवाणगिरीवर कांहीं असत्य दोषारोप केले तें मग दादाभाईंनींहि स्पष्ट आणि समर्पक उ-

मराठी ग्रंथ संग्रहालय

नरें देऊन पार खोडून टाकले. हे फेअरसाहेब इतके स्वेच्छ होते कीं, खुद्द व्हाइसराय साहेबांचीही "कलकत्तावाले बच्चा लोग है, कुच नहि समजते है" असें ह्मणून यांच्या आज्ञा ते तुच्छ लेखीत असत. दादाभाईंनीं या साहेबाचा खर्पूस समाचार घेतल्याचा परिणाम असा झाला कीं, ह्या फेअरसाहेबांच्या हातीं लौकरच लाट साहेबांकडून 'वॉकिंग् टिकेट' मिळालें, आणि सर बार्टल फ्रिअर व सर अर्स्किन पेरी अशा सारख्या थोर अधिकाऱ्यांकडून दादाभाईंस त्यांच्या निर्दोषपणाबद्दल उत्तम अभिप्राय आले.

या नंतर दादाभाई मुंबईच्या स्थानिक स्वराज्याचे कारभारांत शिरले व तेथें त्यांनीं नेहमींप्रमाणें आपल्या सद्गुणानुरूप त्या संस्थेसंबंधाचें सकर्तव्य दोन वर्षें उत्तम प्रकारें बजावून स्वसंतोषानें त्या कामाचा राजीनामा दिला. ग्रँड ज्युरीचे सभासद, युनिवर्सिटीचे फेलो, जस्टीस आफ धी पीस, कार्पोरेशनचे मेंबर, व कायदेकौन्सिलांतले सभासद असे एकेक अधिकार मिळून तत्संबंधीं महत्वाचीं कामें करतां करतां एकीकडे दादाभाईंची लेखणी चाललीच होती. 'हिंदुस्थानचें दारिद्र्य', 'एतद्देशीयांकरितां उंच प्रतीच्या सरकारी जागा,' 'पंजाब इलाख्याची सांपत्तिक स्थिति व त्या इलाख्याच्या गरजा', 'हिंदुस्थानची नैतिकस्थिति व ब्रिटिश राज्यपद्धतिविषयीं एतद्देशीयांचे विचार', तसेंच 'फायनान्स कने-

टीच्या रिपोर्टावर टीका ', ' एज्युकेशन कमेटीपुढें शिक्षणसंबंधीं कांहीं विचार ' इत्यादि अनेक विषयांवर कोठें स्वतंत्र निबंध, कोठें टीका, कोठें पत्रव्यवहार अशा रूपांनीं ते लेखनद्वारां आपल्या देशाची सेवा करीत होते.

याच वेळीं त्यांच्या मनांत असा विचार आला कीं, विशेषतः राजप्रकरणीं वारंवार उद्भवणाऱ्या विविध विषयांवर एतद्देशीय सुशिक्षित लोकांचे विचार एकत्र करून हें " हिंदुस्थानचें ह्मणणें " इंग्रज लोकांपुढें त्यांच्या प्रत्यक्ष माहितीकरितां मांडल्यानें त्यांच्या मनावर लोकमताचा इष्ट परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. हा उद्देश मनांत धेऊन त्यांनीं " व्हॉइस ऑफ इंडिया " या नांवानें एक पुस्तक चालू करून त्यांत अनेक प्रचलित विषयांवरील बहुतेक देशी पत्रकर्त्यांचे स्फुट विचार इंग्रजींत प्रसिद्ध करण्याची सुरवात केली.

इ. स. १८८५ सालीं डिसेंबर महिन्यांत राष्ट्रीय सभेची जी पहिली बैठक मुंबईस होऊन या देशोद्धारक महत्कृत्याचें बीजारोपण झालें त्यांत दादाभाईचें प्रमुख अंग होतेंच. या सभेची ही पहिली बैठक आटोपल्यावर थोड्याच दिवसांनीं दादाभाई विलायतेस गेले. यावेळीं त्यांचा उद्देश निराळाच होता, व तो ब्रिटिश पार्लमेंट सभेंत शिरण्याचा प्रयत्न हा होय.

आमचें वास्तविक सरकार कोण याविषयीं विवेचन करतांना आमच्या ' माळाकारां'नीं आमच्या सरकारची बरोबर

व्याख्या करून ठेविली आहे. ती अशी कीं, आंग्लराष्ट्ररूप महोदधीवर यदृच्छेनें जी लाट उसळेल तिजवरोवर हिंदुस्थानचें तारूं हेलकावत असावें अशी तूर्त दैवघटना असलेल्या कारणानें ती लाट हेंच आमचें खरें सरकार होय. तेव्हां या व्याख्ये- प्रमाणें आमच्या सुख दुःखाचें गाऱ्हाणें ऐकवून आह्मास इष्ट असा त्याचा कांहीं बंदोबस्त करून घेणें असेल तर इकडील कलकत्त्याच्या लाटसाहेबांकडे धांव घेण्यापेक्षां त्या आंग्ल- राष्ट्ररूप महोदधीवरील लाटांची प्रार्थना केली पाहिजे. अथ- वा आपणास अनुकूल अशाच लाटा तेथें उद्भवतील अशा प्रकारचे कांहीं प्रयत्न केले पाहिजेत. ही गोष्ट महाप्रयत्न साध्य खरी पण हीच खऱ्या हिताची आहे हें दादाभाईंच्याही लक्षांत येऊन चुकलें होतें. आणि ह्मणूनच त्यांची लेखणी अविश्रांत त्या दिशेनें चाललेली होती. पण आतां त्यांना असें वाटलें कीं, आंग्लराष्ट्रमहोदधीवर अमुक प्रकारच लाट उठूं देण्याविषयीं सागर महाराजांची प्रार्थना तीरावर उभे राहूनच करण्यापेक्षां या उदधींत स्वतांच अवमज्जन करावें ह्मणजे मुळांतच खळबळ होतांना इष्टसिद्धि करून घेणें सुकर व विशेष खात्रीचें होईल. या हेतूनें त्यांनीं पार्लमेंट सभेत शिर- ण्याची इच्छा धरली व तिच्या सफलतेसाठीं ते इ स. १८८६ त इंग्लंदांत गेले. इंग्लंदामध्यें आधींच दादाभाईंची मान्यता व चहा पुष्कळ होती. त्यामुळें त्यांस होल्बोर्नवरोच्या तर्फे

पार्लमेंटच्या निवडणुकीचे वेळीं उमेदवार होऊन उभें राहतां आलें.

ब्रिटिश राज्यसत्तेमध्यें, विशेषत: स्वसत्तेंतल्याच पण परदेश-संबंधीं कारभारांत मतलबीपणाची छटा बरीच दिसून येत असो, तथापि एकंदरींत उदार, न्यायी व समंजसपणाचा डौलच तींत पुष्कळ असल्यामुळें ही सत्ता विशेष सुखावह आणि अल्हादकारक वाटते. इंग्लंद देशाचीं राजसूत्रें चालविणाऱ्या आंग्लजनाधिष्ठित प्रतिनिधींच्या सभेंत हिंदुस्थानांतील मनुष्यास एक प्रतिनिधी होऊन बसतां यावें हें सर्वत्र विलक्षणच वाटेल. पण पूर्वोक्त औदार्यादि त्रयीच्या डौलामुळें असाही प्रकार बिनहरकत होतो व त्यामुळें ब्रिटिश राज्यसत्ता अत्यंत स्पृहणीय अशीच वाटूं लागते. आह्माला वेळोवेळीं मिळालेल्या समदृष्टीच्या ज्या आश्वासनांवर आह्मी नादावून भावी सुखाशेवर लुब्ध होतों तीं आश्वासनें देखील अशींच या सत्तेची थोरवी मनांत ठसवून देत असतात. असो, हॉलबोर्नवरोच्या तर्फे दादाभाई उमेदवार उभे राहिल्यावर त्यांनीं मतें मिळवण्यासाठीं सभांतून व पत्रांतून व्याख्यानलेखनांचा सपाटा चालविला लिबरलपक्षाचे कित्येक उदारधी पुरुष त्यांस अनुकूल होऊन त्यांच्या तर्फे मतें जमविण्याची खटपट करूं लागले. हिंदस्थानचेवरें वाईट करण्याची सत्ता पार्लमेंटच्या हातीं असून ती सत्ता वापरतांना त्या हतभाग्य देशाच्या वतीचा कोणीही मुखत्यार पार्लमेंटमध्यें नसावा हें उदार व न्यायी ह्मणून गाजत

असलेल्या राष्ट्रास उचित नाहीं, तेव्हां या लोकांच्या कल्याणास मदत या दृष्टीनें मला निवडून आपणें द्यावें अशी एक दादाभाईंची त्या लोकांना विनंति होती. पण ती जागा बहुतेक कान्सरवेटिव पक्षाच्या मतदारांचीच असल्यामुळें या वर्षी दादाभाईंच्या यत्नास यश आलें नाहीं.

या अपयशानें दादाभाई निरुत्साह झाले नाहींत. त्यांनीं परवां मुंबई येथें सांगितल्याप्रमाणें ही खटपट दुसऱ्या निवडणुकीचे वेळीं त्यांना फिरून यत्न करण्यास फार उपयोगी पडली. ते ह्मणाले, " प्रथम इ० स० १८८६ मध्यें होलबोर्नबरो येथील मतदारांच्या तर्फे लिबरल पक्षाचा उमेदवार ह्मणून जेव्हां मी पुढें आलों त्यावेळीं माझी कोणासही माहिती नव्हती. लिबरल पक्षाच्या मतदारांनीं मला प्रथम अगदीं छेडून घेतलें. इंग्लंडांतील अनेक राजकीय प्रश्नासंबंधानें माझे काय विचार आहेत याविषयीं मला अनेक प्रश्न करून मजकडून त्याचीं उत्तरें ऐकलीं, व माझ्या मतांची फार बारकाईनें विचारपूस केली. या परीक्षेंत जेव्हां त्यांची मजविषयीं खात्री झाली तेव्हांच त्यांनीं मला आपल्या तर्फे उमेदवार ह्मणून उभें राहूं दिलें. माझा त्या वेळीं प्रतिपक्षी जो उमेदवार होता तो कान्सरवेटीव पक्षाचा होता व पार्लमेंट सभेंतला तो पूर्वीचा सभासद असून त्याचें लोकांत वजनही फार होतें. शिवाय होलबोर्नबरो हें स्थान ह्मटलें ह्मणजे कान्सरवेटी पक्षाच्या मतदारांचें आगरच होय.


अशा स्थितींत मजगारख्या आते दूरच्या एका विदेशी गृह-स्थानें केवळ आठ दहा दिवसांच्याच खटपटीनें पार्लमेंट सभेंत शिरण्याची हाव धरणें हें एक प्रकारें वेडेपणच ह्मटलें पाहिजे. त्या वेळच्या माझ्या यत्नास यश येणें नाहीं ही गोष्ट माझे सहायकारी मित्रही जाणून होते. पण तशा योगानें मी लोकांस माहीत तरी होईन अशा हेतूनें त्यांनीं मला निराशेनें मागें सरूं न देतां खटपट करण्यास उत्तेजन दिलें, व ही त्यांची मसलत पुढें माझ्या उपयोगी फार चांगली पडली. ”

या नंतर दादाभाई लवकरच हिंदुस्थानांत आले. इकडे आल्यावर कलकत्ता येथें राष्ट्रीय सभेची दुसरी बैठक व्हावयाची होती, तिचें अध्यक्षस्थान त्यांनीं सुशोभित केलें. या वेळचें प्रारंभींचें त्यांचें भाषण फारच उत्तम झालें. तें मर्यादित होतें, राजनिष्ठाद्योतक होतें, व राजकर्त्यांनीं विचारांत घेण्यासारख्या अनेक महत्वाच्या सूचनांनीं परिपूर्ण होतें. राष्ट्रीय सभेचें काम आटोपून दादाभाई मुंबईस आले त्यावेळीं सर-दिनशा माणकजी पेटिट यांच्या अध्यक्षतेखालीं एक मोठी सभा भरवून मुंबईकरांनीं दादाभाईंचा फार सत्कार केला. पुढें मग दादाभाई लौकरच विलायतेस गेले.

पुढें इ० स० १८९२ त, ह्मणजे गतवर्षी, पार्लमेंट सभा मोडून पुनः तिचे प्रतिनिधि निवडण्याचा प्रसंग आला. हा

प्रसंग साधण्याविषयीं दादाभाई टपून होतेच. ते सेंट्रल फिन्सबरी येथील लिबरल पक्षीय मतदारांच्या तर्फे प्रतिनिधी निवडून जाण्यासाठीं उमेदवार झाले. यावेळीं मात्र दादाभाईंच्या खटपटीस यश येऊन ते ब्रिटिश पार्लमेंटांत सभासद झाले आणि त्यामुळें इंग्लिश लोकांच्या राज्यरीतिचे उदारत्वाचा कीर्तिदुंदुभी उच्च घोषानें एक वेळ सर्वत्र गाजण्यास व आह्मा भाग्यहीन लोकांच्या नेहमींच्या पारतंत्र्यजन्य उदास वृत्तीस या मिषानें तरी किंचित् आनंदाचें भरतें येण्यास हें एक इतिहासांत सुवर्णाक्षरानें नमूद करण्यासारखें कारण घडून आलें.

अस्तु, या स्वदेशहितनिरत पुरुषाचें संस्मरणीय चरित्र येथपर्यंत येऊन पोहोंचलें आहे. परमेश्वर कृपेनें यांस दीर्घायुरारोग्य होऊन या देशाच्या ऊर्जितावस्थेस याचे परिश्रम सार्थकीं लागोत एवढें अभिष्ट चिंतून तूर्त इतकेंच पूर्ण करूं.



पुणें येथें "श्री शिवाजी" छापखान्यांत छापिलें.

## ॥ पद्यकुसुमें ॥

स्वातंत्र्यभावमूल घोर विपदा गांजीत देशास या ॥
पाहोनी हृदयांत जो कळवळे डाजे दुजें ना जया ॥
देशामाजिं सदां असह्य घडती निःशंक अन्याय जे ॥
त्यांहीं पेटुनि अंतरीं निजसुखत्यागास ही जो सजे॥ १
जीतें एक सुपुत्र मात्र भजती भावोनि कीं देवता ॥
रक्षायास सुदक्ष राहनि जिला, नाहीं तसें जीविता ॥
त्या साहोनि वियोग भूजननिचा देशांतरीं जो खपे ॥
तेथूनी दृढनिश्चयें निजजनां जो उद्धराया जपे ॥ २ ॥
धैर्यें निश्चल जो सदां तळमळे लोकापदा पाहुनी ॥
कर्मीं शुद्ध तसा मनें सरळ जो विश्रांति जो नागणी॥
त्यक्तस्वार्थ, मनीं सकोप हि परी साहे परांच्या मदा ॥
दादाभाइ सुमानुषेश विलसो पावोनि भव्यास्पदा ॥
लोकीं आज असंख्य देशबुडवे जाणों पुरे नाटकी ॥
देशासाठिं गहींवरोनि रडती कर्मीं परी खाटकी ॥
देतीं आर्टिकलें तशीं फुकटचीं ते लेक्चरें झोडिती ॥
स्वार्थी कीं स्वसुखास हानि घडतां नेणों कुठें लो-
पती ॥ ४ ॥ देशातें परता करून परक्या सेवून सं-
पादिती॥जस्टिस् रावबहादुरादि पदव्या द्रव्यांहि नाहीं
मिती॥हा तो शुष्काचि सर्व गौरव परें स्वार्थार्थ कीं जो
दिला॥लोकीं तोचि सुधन्य जो ह्मणितला दीन स्व-
देशें भला ॥ ५ ॥

# स्वदेशभक्तांस ह्यूमसाहेबांचें प्रोत्साहन !

(श्लोक.)



" बैसा कसे [illegible]मितसे जन हो सहाय, येणार कोण गगनांतुनि [illegible] काय । होवोनि स[illegible]ज दृढ कास कसाचि आतां, [illegible] आश्रय दुजा न दिसे पहातां ॥ आहांत कोण [illegible]ज कीं गुलाम, कां लोळतां तमिं असे मग नष्टधाम । सिद्धी करीच असतां न दिसे कशानें, राष्ट्रास वैभव चढेल कसें भिकेनें ॥ वाचा न काय दिधली परमेश्वरानें, कैसे बसां मग निचेष्ट असोनि भानें । भांडा न शून्यमुख व्हा झगडा अनर्थ, हा कोण वारिल तुम्हींच असां समर्थ ॥ गेला दिपोनि जणुं कीं शिशु काय आहां, कां हो असे लपतसां भय काय वाहां । धैर्ये खुशाल सुधरा पथ राजमान्य, तोडील बंध तुमचे नच कोणि अन्य ॥ मोठा जसा लवलुवाट किडे करीती, अंधारिंची मुळमुळें रड तेच रीती । अन्याय ते न चुकती समजा अशानें, सिंहास झुंज न दिली भितऱ्या ससानें ॥ उठा बंधुनो कां भितां संकटांना, विसावा न घ्या नीतिनें भांडतांना । अहां प्राच्य तुम्ही सदां स्वप्रकाश, चढे वैभवा स्वोद्यमें मात्र देश ॥ " —बालमित्र अं. ९—

---


बालमित्र—उपयुक्त सुबोध व सचित्र मासिक पुस्तक. मुलाबाळांच्या कुटुंबांत शोभण्यासारखें. किं० ८ आणे ट० हं० ३ आणे.

पैसा मिळविण्याची युक्ति—प्रामाणिक उद्योगानें निर्वाह करूं इच्छिणाऱ्यानें वाचण्यासारखें पुस्तक. किं० ४ आणे.

संगीत शुक्रचरित नाटक—फारच उत्तम. किं० ६ आणे.

☞ पत्ता—कोरींव चित्रांचा कारखाना, शनवार पेठ, पुणें.


---

S. P. P.